# प्रेसनोट

दिनांक:- ११/०३/२०१९

## रस्ता सुरक्षेचे दृष्टीने वाहतूक शाखेतर्फे नागरिकांचे समुपदेशन

पुणे शहराची वाढती लोकसंख्या व त्या पटीने वाढत असलेली वाहनाचीं संख्या यामुळे पुणे शहरात व आसपास गजबजलेल्या ठिकाणी वाहन अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याला एक महत्त्वाचे कारण म्हणजे वाहन चालकांचा बेशिस्त व बेदकारपणा तसेच रस्ते सुरक्षेबाबत अनभिज्ञता असने हे होय. पुणे शहरातील व आसपासची वाहतूक व्यवस्था सुरळीत करणेबरोबरच वाहन चालकांना मुख्यत्वेकरुन मोटार सायकलस्वार यांना रस्ता सुरक्षा संदर्भात तसेच स्वयंम: सुरक्षेसंदर्भात विविध तज्ञ व्यक्ती मार्फत समुपदेशन करुन त्यांना शिस्त लावणे व वाहन अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा अभिनव उपक्रम पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त यांनी नियमित सुरु केलेला आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून सोमवार दिनांक. ११/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते १३.०० वा. चे दरम्यान रस्ता सुरक्षा संदर्भात वाहन चालकांना समुपदेशन कार्यक्रमाचे ५८ वे सत्राचे आर.एस.पी शेड क्र. ३, पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथे आयोजन करण्यात आले होते

समुपदेशन कार्यक्रमाचे ५८ वे सत्राचे वेळी मानसोपचार तज्ञ डॉ. आनंद कुलकर्णी यांनी आपल्या सवयी व वर्तन या विषयाला धरुन वाहनचालकांचे हेल्मेट परिधान करणेबाबत मार्गदर्शन व प्रबोधन केले त्यावेळी त्यांनी D-GAP ॲब्रीव्हेशन बाबत सांगितले वाहनचालकांनी D म्हणजे Discipline, G म्हणजे Goal, A म्हणजे Attitude व P म्हणजे Plan या गोष्टींचा अवलंब करुन हेल्मेट परिधान करण्याचा संकल्प केला पाहिजे, त्यामुळे हेल्मेट परिधान करणे हे स्वत:च्या सुरक्षेसाठी महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे अपघात झाल्यास मेंदूला इजा पोहचण्याचे प्रमाण कमी होते. मेंदू हा शरिराचा सर्वात महत्त्वाचा अवयव आहे असे सांगितले.

पोलीस निरीक्षक, राजेश पुराणिक, वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी सदरवेळी सांगितले की, रस्ता सुरक्षेच्या मुख्य घटकांचा उपयोग करून रस्ता सुरक्षा संदर्भात व स्वयंशिस्त संबंधात शिक्षण व समुपदेशन देण्यात येत आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की, समुपदेशन ही शिक्षा नसुन संधी आहे. वाहन चालवताना हेल्मेट/सिटबेल्ट परिधान करणे ही सक्ती नसून रस्ता सुरक्षेच्या शिस्तीचा भाग आहे. त्यामुळे स्वत:ची सुरक्षा होते. मा. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१६ मध्ये पारीत केलेल्या " गुड सॅमरिटन " कायद्याबाबत माहिती देवून मार्गदर्शन केले.

समुपदेशन विभागात नेमणुकीस असलेले सहा. पोलीस उप निरीक्षक, फेबियन सॅमसन यांनी हेल्मेट, सीटबेल्ट तसेच वाहतुकीचे नियम व सुरक्षित वाहन चालविण्याचे महत्व याबद्दल वाहनचालकांना मार्गदर्शन केले व वाहन चालवितांना काळजी घेण्याचा व वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले.

सदर कार्यक्रमास एकुण ०९ वाहनचालक उपस्थित होते. त्यामध्ये महिला, विद्यार्थीवर्ग, व्यापारी व जेष्ठ नागरीक इत्यादी समाजातील सर्व घटकातील नागरीक उपस्थित होते. सदर समुपदेशन कार्यक्रमादरम्यान वाहन चालकांशी संवाद साधून त्यांचा सुद्धा प्रतिसाद समजावून घेण्यात आला.

पुणे शहर वाहतूक शाखेतील २२ विभागामार्फत सध्या रस्ता सुरक्षा संदर्भात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करून त्यांना समुपदेशनासाठी बोलवण्यात येत आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाचे दि. ३१/१२/२०१५ रोजीचे शासन निर्णयाव्दारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांचे समुपदेशन करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

सदर कार्यक्रमाचे आयोजन व सुत्रसंचालन वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. राजेश पुराणिक यांनी केले. त्यांना सदर कार्यक्रमासाठी वाहतूक शाखेच्या पोलीस उप आयुक्त,यांचे मार्गदर्शन लाभले.

दिनांक- ०७/१२/२०१८ पासून आज पर्यंत (दिनांक- ११/०३/२०१९) एकुण ५८ समुपदेशनाचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आले आहेत. सदर कार्यक्रमात एकुण ४,२६६ वाहनचालक उपस्थित होते. त्यांना योग्य मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले आहे.